मुंबई मेट्रो मार्गिका-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) प्रकल्पाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य शासनाची तत्वत: मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमएमआर-३३१६/प्र.क्र.९७/नवि-७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २५ ऑगस्ट, २०२२.**

संदर्भः-

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. एमआरडी-३३११/प्र.क्र.१४९/नवि-७, दि.०३ मार्च, २०१४.

२) केंद्रीय शहर विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक No.K-१४०११/३६/२००९-Metro/MRTS-II (Vol.III), दिनांक १८ जुलै, २०१४.

प्रस्तावनाः-

मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-३ प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० सहभाग असलेल्या मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि. या एसपीव्ही कंपनीमार्फत करण्यात येत आहे. केंद्रीय शहर विकास मंत्रालयाचे संदर्भाधीन पत्र दिनांक १८ जुलै, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. शासनाने संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०३ मार्च, २०१४ अन्वये प्रकल्प अंमलबजावणीस मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा मूळ मंजूर पुर्णत्व खर्च रु.२३,१३६ कोटी इतका असून त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा समभाग, कर, जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्चापोटी केंद्र व राज्य शासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज, जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे बाह्यकर्ज इत्यादी प्रमुख माध्यमातून निधी उपलब्ध करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या हिश्श्याचा समभाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वहन करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत टनेल बोअरिंग मशिन्सद्वारे एकूण ५५ किमी लांबीच्या जुळ्या बोगद्यांपैकी ५४ किमी बोगद्याचे काम पूर्ण (९८.६%) झाले आहे. २६ भूमीगत स्थानकांचे काम प्रगतीपथावर असून भूमीगत स्थानकांसाठीचे सुमारे ८२.६ % पूर्ण झाले आहे.सदर प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. रोलींग स्टॉक, सिग्नलिंग व ट्रेन कंट्रोलींग, प्लॅटफॉर्म स्क्रिन दरवाजे व दुरसंचार प्रणाली विद्युत पुरवठा प्रणाली, बोगदा वायुविजन व वातावरण कंट्रोल प्रणाली, ट्रॅक वर्क कर्षण प्रणाली, सरकते जिने, उद्वाहन, स्वयंचलीत भाडे संग्रहन प्रणाली, इत्यादी प्रणाली (Systems) शी संबंधित कामे अंमलबजावणीच्या विविध टप्प्यात आहेत.

प्रकल्पांतर्गत बहुतेक कामांच्या निविदा प्रदान केल्यानंतर प्रकल्पाच्या एकूण खर्चाचा अंदाज आल्याने सुधारित प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत हाती घेण्यात

आले. सल्लागार कंपनीमार्फत माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये रु.३३,४०५.८२ कोटी सुधारित प्रकल्प खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. च्या संचालक मंडळाच्या ५० व्या बैठकीत सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास तसेच रु.३३,४०५.८२ कोटी च्या सुधारित खर्चास व वित्तीय सहभाग आराखड्यास मान्यता दिल्यानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ने दि.२८.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मुंबई मेट्रो मार्गिका-३ प्रकल्पाच्या सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास तत्वतः मंजूरी देवून केंद्र शासनाच्या मंजूरी करिता प्रस्ताव सादर करण्याबाबत राज्य शासनास विनंती केली आहे. स्थापत्य कामांच्या बाजारनिश्चित किंमतीमुळे खर्चात झालेली वाढ, मुंबईची स्थानिक परिस्थिती, प्रकल्पाच्या तांत्रिक गरजा व आव्हाने, निविदा अटी, इत्यादींचा एकत्रित परिणाम प्रकल्पाच्या किंमतीवर झाला आहे. यामुळे मूळ पुर्णत्व खर्चात रु.१०,२७० कोटींची वाढ होऊन रु.३३,४०५.८२ कोटी इतकी सुधारित किंमत होत आहे. सदर सुधारित प्रकल्प खर्चाच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहेः-

शासन निर्णयः-

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी सादर केलेल्या मुंबई मेट्रो मार्गिका-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) प्रकल्पाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे :-

१. मुंबई मेट्रो मार्गिका-३ प्रकल्पास केंद्र शासनाच्या मंजूरीचे पत्र दिनांक १८.०७.२०१३ मधील अट क्र.७ (जी) येथे वैधानिक केंद्रीय कर/शुल्क आणि चलन विनिमय दरातील बदलांमुळे होणारी कोणतीही किंमत वाढ भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांचेमध्ये समाप्रमाणात केली जाईल. किंमतीत वाढ, प्रकल्प व्याप्तीतील बदल किंवा मंजूर कालावधीच्या आत आणि त्यापलीकडे टाळता येण्याजोगा विलंब तसेच डीपीआरमध्ये न दर्शविलेल्या अत्यावश्यक घटकांचा समावेश यामुळे होणारी कोणतीही खर्चवाढ संपूर्णपणे महाराष्ट्र शासनाद्वारे वहन केली जाईल, अशी अट घालण्यात आली आहे. सदरची अट शिथील करून प्रकल्पाच्या वाढीव खर्चात केंद्र शासनाचा सहभाग मिळण्याकरिता केंद्र शासनास विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यता रु.२३,१३६ कोटी मध्ये रु.१०,२६९.८२ कोटी इतकी वाढ झाल्याने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ने सादर केलेल्या रु.३३,४०५.८२ कोटी इतक्या सुधारित प्रकल्प खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

३. सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास सोबतच्या <u>परिशिष्ट-अ</u> येथील रु.३३,४०५.८२ कोटी खर्चाच्या सुधारित वित्तीय सहभाग आराखड्यासह राज्य शासनाची तत्वत: सहमती दर्शविण्यात येत आहे.

४. सुधारित वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाचा समभाग मूळ मंजूर रक्कम रु. रु.२४०२.०७ कोटी वरुन रु.३६९९.८१ कोटी होत आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या

समभागापोटी देय वाढीव रक्कम रु.१२९७.७४ कोटी यापूर्वीच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना उपलब्ध करून देणेबाबत प्राधिकरणाला निर्देश देण्यात येत आहेत.

५. सुधारित वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाने भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत आणि कर यापोटी द्यावयाची मूळ देय रक्कम रु.२४२१.१० कोटी वरून रु.२,५५४.३० कोटी अशी होत आहे. त्यामुळे राज्य शासनाकडून सुधारित खर्चापोटी वाढीव देय रु.१३३.२० कोटी रक्कमचे बिनव्याजी दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सुधारित वित्तीय आराखड्यानुसार जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे (JICA) कर्ज रू.१३,२३५.०० कोटी वरुन रू.१९,९२४.३४ कोटी इतके होत आहे. सदर वाढीव रू.६६८९.३४ कोटी रक्कमेचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. JICA कडून सदरचे वाढीव कर्ज घेण्यासाठी केंद्र शासन, JICA यांच्याबरोबर समन्वय साधण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. सदरची सुधारित प्रकल्प किंमत रु ३३,४०६ कोटी ही सन २०२१ पर्यंतची अंदाजित किंमत आहे. त्यानंतर COVID-१९ च्या प्रादुर्भावामुळे आलेले अडथळे व आरे कारशेडवरील स्थगिती यामुळे प्रकल्प जून, २०२४ पर्यंत कार्यान्वयित होणे अपेक्षित आहे. तथापि, सन २०२१ ते सन २०२४ या कालावधीत सल्लागाराचे अतिरिक्त शुल्क- रु.५२० कोटी, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यावरील अतिरिक्त खर्च -रु. ७०० कोटी, स्थापत्य व प्रणाली कामांतील भाववाढ- रु.१५०० कोटी, कार्यालयीन खर्च - रु.१५० कोटी, करांवरील खर्च- रु.१००० कोटी असा एकूण रु. ३८७० कोटी याप्रमाणे संभाव्य खर्चवाढीस तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

८. वाढीव कर्जासाठी जायका (JICA) च्या अटी व शर्ती पूर्वीच्याच वा त्याहीपेक्षा फायदेशीर राहतील याबाबत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ने प्रयत्न करावा.

९. मुंबई मेट्रो मार्गिका-३ प्रकल्पाचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. सदर प्रकल्पाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी देण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाशी आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यास नगर विकास विभागास प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. सदरचा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.२७८/का.१४४४ दि.२५.०२.२०२२ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२५४/व्यय-३ दिनांक २४.०८.२०२२ अन्वये प्राप्त मान्यता व दिनांक १०.०८.२०२२ रोजी मा. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२०८२५१३२१२३९५२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरिने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. मंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. प्रधान सचिव (पदुम), कृषी, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१५. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१७. प्रधान सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८. प्रधान सचिव (ऊर्जा) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१९. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२०. सचिव, (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२१. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२२. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२३. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई.
२४. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
२५. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई.
२६. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२७. पोलिस आयुक्त, मुंबई
२८. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, वरळी, मुंबई.
२९. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रायव्हेट लिमिटेड.
३०. जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर

३१. सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई.
३२. व्यवस्थापकीय संचालक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम, (बेस्ट), मुंबई.
३३. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
३४. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
३५. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३६. संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
३७. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३८. कार्यासन अधिकारी (नवि-२१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३९. निवड नस्ती (नवि-७).

## परिशिष्ट-अ

सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालानुसार विविध संस्थांचा वित्तिय सहभाग आराखडा:-

| अ.क्र. | निधी उभारणीचा तपशिल | मूळ मंजूर हिस्सा (रु.कोटी) | सुधारित हिस्सा (रु.कोटी) |
|---|---|---|---|
| १. | केंद्र शासनामार्फत समभाग | २४०२.७ | ३६९९.८१ |
| २. | राज्य शासन/मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत समभाग | २४०२.७ | ३६९९.८१ |
| ३. | केंद्र शासन यांच्यामार्फत दुय्यम कर्ज (एकूण कराच्या ५०%) | १०२४.५ | १०७१.५६ |
| ४. | राज्य शासन यांच्यामार्फत दुय्यम कर्ज (खाजगी भूसंपादनावरील खर्च+ पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्च+ एकूण कराच्या ५०%) | १६१५.१ | २५५४.३० |
| ५. | मालमत्ता विकास, परिणाम शुल्क (Impact Fee)/ सुधारणा कर (Betterment Tax) | १००० | १०००.०० |
| ६. | भागधारकाकडून अर्थसहाय्य (Mumbai International Airport Limited) | ७७७ | ७७७.०० |
| ७. | एमएमआरडीएकडून अनुदान | ६७९ | ६७९.०० |
| ८. | जपान आंतरराष्ट्रीय संस्थेकडून कर्ज | १३२३५ | १९९२४.३४ |
| | एकूण प्रकल्प किंमत | २३१३६ | ३३४०५.८२ |

टीप- मूळ मंजूर प्रकल्प किंमत रु.२३१३६ कोटी मध्ये राज्यशासनाने सोसावयाच्या राज्यस्तरीय/स्थानिककरांची एकूण रक्कम रु. ८०६ कोटी समाविष्ट नाही.

*************

(विजय चौधरी)
उप सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.